<table>
<tr><td>MHRT030019892025</td><td><u>फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २६०/२०२५</u><br>महेश दगडू गुरव<br>वि.<br>महाराष्ट्र सरकार करिता पोलीस निरीक्षक, रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन व.३</td></tr>
</table>

## <u>निशाणी क्र.०१ वरील आदेश</u>
## (घोषित दिनांक १६/०३/२०२६)

अर्जदार महेश दगडू गुरव याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ प्रमाणे रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक २४०/२०२५, [भारतीय न्यायसंहिता कलम ३८०, ३४] या कलमान्वये दाखल असणाऱ्या गुन्ह्यामध्ये जप्त करणेत आलेले सोन्याचे दागिने – सोन्याचे मंगळसूत्र–५५ ग्रॅम वजनाचे त्यामध्ये काळे मणी, २ वाटया (संक्षिप्तेकरिता “जप्त दागिने”) परत मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार, सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराच्या मालकीचे सोन्याचे दागिने जप्त केले असून ते सध्या शहर पोलीस स्टेशन येथे जमा आहेत. सदर जप्त मंगळसूत्र हे अर्जदाराच्या पत्नीच्या दैनंदिन वापरातील असून त्यास धार्मिक व वैवाहिक दृष्टया विशेष महत्व आहे. प्रस्तुत मंगळसूत्र हे गुन्ह्याच्या तपासासाठी दीर्घकाळ जप्त अवस्थेत ठेवल्यास ते खरेदी करण्यामागील मूळ हेतू निष्फळ ठरेल. तसेच अर्जदार व त्यांची पत्नी यांना त्या दागिन्यांचा उपभोग घेण्यापासून वंचित राहावे लागेल. प्रस्तुत जप्त दागिने हे अर्जदाराच्या मालकीचे असून त्याबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क अथवा संबंध असल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. त्यामुळे जप्त दागिने अर्जदारास परत मिळावेत यासाठी अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

३. तपास अधिकारी यांनी निशाणी क्र.५ वर लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी सदर अर्जामधील सोन्याचे दागिने जप्त केल्याचे व ते त्यांच्या ताब्यात असल्याचे नमूद केले आहे. तसेच जप्त मुद्देमाल योग्य त्या अटी व शर्तींवर अर्जदार/फिर्यादी यांना सुपूर्त करण्याबाबत न्यायालयाने योग्य ते आदेश करावेत अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.६ वर लेखी म्हणणे सादर करून आक्षेप नोंदविला आहे की, जप्त दागिन्यांपैकी अनुक्रमांक १ चे मंगळसूत्र याचे नमूद वजन व अर्जासोबत दाखल केलेल्या पावतीतील वजन यामध्ये तफावत दिसून येते. तसेच जप्त दागिन्यांच्या मालकीबाबत कोणताही ठोस दस्तऐवज पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे सदर दागिने ज्या फायनान्स कार्यालयात गहाण ठेवले होते, त्या संस्थेकडून कोणतेही लेखी प्रमाणपत्र अर्जासोबत दाखल केलेले नाही. तसेच तपास अधिकारी यांनी सदर गुन्ह्यात एकूण ११ वस्तू जप्त केल्या असून त्या वस्तू आरोपी क्र.२ व ३ यांनी कोणाकडून घेतल्या किंवा त्या कोणाच्या मालकीच्या आहेत याबाबत तपास अद्याप सुरू आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

५. अर्ज, सादर केलेले म्हणणे व अभिलेख यांचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे विधिज्ञ व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे युक्तिवाद श्रवण केले.

६. अर्जदाराने सदर अर्जासोबत अर्जदाराच्या आधारकार्डाची छायांकित प्रत निशाणी क्र.४/३ कडे व रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन येथील गुन्हा रजि.क्र.२४०/२०२५ दाखल झाल्याची प्रत निशाणी क्र.४/२ कडे दाखल केलेली आहे. अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे दिसून येते की, अर्जदाराच्या घरात दिनांक १६ मे २०२४ रोजी चोरी झाल्यामुळे त्यांनी रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. अर्जदाराने निशाणी क्र.९ वर शपथपत्र सादर करून जप्त दागिने खरेदी केल्याबाबतचे मूळ बिल त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर दागिने सन २००५ ते २००६ या कालावधीत तयार करून घेतले असल्याचे सांगितले आहे. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला क्र.२ व ३ म्हणजेच गुन्ह्यातील आरोपी यांना नोटीस बजावण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्यांनी निशाणी क्र.८ वर हजर राहून जप्त दागिन्यांबाबत त्यांचा कोणताही संबंध नसल्याचे नमूद करून न्यायालयाने योग्य ते आदेश करावेत अशी विनंती केली आहे.

७. तपास अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्यात जप्त दागिने अर्जदाराचे असल्याचे नमूद केले असून त्याबाबत कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. तसेच अर्जदाराने शपथपत्राद्वारे दागिने खरेदीचे बिल उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले आहे. भारतीय

समाजातील प्रचलित प्रथा व व्यवहारानुसार दीर्घकाळापूर्वी खरेदी केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची पावती अनेकदा जतन करून ठेवली जात नाही, ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास येणारी आहे. त्यामुळे केवळ खरेदीची पावती उपलब्ध नसल्याच्या कारणावरून अर्जदाराचा दावा नाकारणे न्यायोचित ठरणार नाही.

८. तसेच सरकारी अभियोक्ता यांनी मांडलेला वजनातील तफावतीचा आक्षेप विचारात घेतला असता असे दिसते की, दागिन्यांचे वजन मोजण्याच्या पद्धती, दागिन्यांमध्ये असलेले इतर घटक अथवा नंतर झालेल्या किरकोळ बदलांमुळे अशा प्रकारची तफावत निर्माण होऊ शकते. केवळ वजनातील तफावत असल्यामुळे अर्जदाराचा हक्क पूर्णपणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्याचप्रमाणे आरोपी क्र.२ व ३ यांनी निशाणी क्र.८ वर त्यांचे म्हणणे दाखल करून जप्त दागिन्यांवर कोणताही दावा नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच जप्त दागिन्यांवर अन्य कोणत्याही व्यक्तीने हक्क सांगून आज रोजी पर्यंत अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे अभिलेखावरील उपलब्ध परिस्थितीवरून अर्जदार हा सदर जप्त दागिन्यांचा प्रथमदर्शनी मालक असल्याचे दिसून येते.

९. भारतीय नागरी सुरक्षा संहिता, कलम ५०३ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जप्त मुद्देमालाबाबत फौजदारी न्यायालयासमोर हक्कदार असलेली व्यक्ती योग्य त्या अटी व शर्तींवर सदर मुद्देमाल सुपूर्तगीने मागू शकते. तसेच चौकशी किंवा संपरिक्षेच्या दरम्यान जप्त मालमत्ता न्यायालयासमोर सादर झालेली नसल्यास त्या मालमत्तेची विल्हेवाट लावणे अथवा ती हक्कदार व्यक्तीकडे सुपूर्त करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार न्यायालयास आहे. तपास अधिकारी यांनी अद्याप सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे गुन्ह्याच्या अंतिम निकालासाठी बराच कालावधी लागू शकतो. या संदर्भात **मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई विरुद्ध गुजरात राज्य (२००२) १० एस.सी.सी. २८३** या प्रकरणात स्पष्ट निर्देश दिले आहेत की, जप्त मुद्देमाल दीर्घकाळ पोलीस ठाण्यात निष्क्रिय अवस्थेत ठेवणे योग्य नाही व तो योग्य अटींवर हक्कदार व्यक्तीस सुपूर्त करणे आवश्यक आहे. सदर न्यायनिवाड्यातील निर्देशांचा विचार करता व अभिलेखावरील एकूण परिस्थितीचे मूल्यांकन करता, जप्त केलेले दागिने पोलीस ठाण्यात विनाकारण दीर्घकाळ ठेवणे न्यायोचित ठरणार नाही असा निष्कर्ष निघतो.

१०. सादर केलेल्या कागदपत्रांवरून व अभिलेखावरील परिस्थितीवरून सदर दागिने अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर दागिने पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त केल्याची बाब वादग्रस्त नाही. तसेच जप्त दागिन्यांवर हक्क सांगणारा अन्य कोणताही अर्ज अभिलेखावर दाखल झालेला नाही. त्यामुळे अर्जदार हा जप्त दागिन्यांचा अंतरिम ताबा मिळविण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच सरकारी अभियोक्ता यांनी घेतलेले आक्षेप हे सदर अर्ज पूर्णतः नामंजूर करण्यासाठी पुरेसे किंवा ठोस स्वरूपाचे नाहीत. उलट, योग्य त्या अटी व शर्ती घालून जप्त दागिने अर्जदाराच्या ताब्यात सुपूर्त करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | पोलिस निरीक्षक, रत्नागिरी शहर पोलिस ठाणे/तपासी अधिकारी, रत्नागिरी ग्रामीण पोलिस ठाणे (गुन्हा रजिस्टर नंबर २४०/२०२५) यांना निर्देशित करण्यात येते की, सदर गुन्ह्यामध्ये जप्त करणेत आलेले सोन्याचे मंगळसूत्र–५५ (५९.२) ग्रॅम वजनाचे त्यामध्ये काळे मणी, २ वाटया हे अर्जदारास रक्कम रु.३,५०,०००/– (रुपये तीन लाख पन्नास हजार मात्र) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावे. |
| २. | अर्जदाराने प्रकरणाच्या चौकशीसाठी वरील नमुद दागिन्यांची आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावे. |
| ३. | अर्जदाराने जप्त दागिने ताब्यात मिळाल्यानंतर प्रस्तुत खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत ती कोणालाही विकू नये अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये. |
| ४. | सदर मुद्देमालाची न्यायालयास जेव्हा जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सदरचा मुद्देमाल अर्जदाराने न्यायालयात स्वखर्चाने हजर करावे. |
| ५. | तपासी अधिकारी यांनी सदर जप्त दागिने अर्जदारास परत करण्यापूर्वी त्याबाबतचा स्वतंत्र पंचनामा करुन त्याबाबतचे छायाचित्र काढावेत व |

| | |
|---|---|
| | अर्जदाराने दिलेल्या हमीपत्रासह या न्यायालयात दोषारोपपत्रासोबत दाखल करावे. छायाचित्र काढणेचा खर्च अर्जदाराने करावा. |
| ६. | सदर जप्त दागिन्यांबद्दल भविष्यामध्ये कोणीही तृतीय व्यक्तीने हक्क सिद्ध केल्यास अर्जदाराने ते दागिने परत सादर करणे बंधनकारक राहील. |
| ७. | प्रस्तुतचा आदेश तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावा. |

SHABNAM YUNUS SHAIKH

Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.03.16 17:22:52 +0530

(शबनम युनूस शेख)

ठिकाण – रत्नागिरी

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रत्नागिरी.

दिनांक – १६/०३/२०२६.

(न्यायालय क्र.२)

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Judicial Magistrate F.C., Court no.2, Ratnagiri |
| Name of Clerk | :- | S.N.Kulkarni |
| Date of Decision | :- | 16/03/2026 |
| Judgment/order signed by P.O. on | :- | 16/03/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 16/03/2026 |